eEVV/VC

(कायम विना अनुदानित )

जाक्र शिंउसं /नावि/ माध्य-२/अवि/शिमा/२०२१
विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय
नाशिक जि. नाशिक
दिनांक : /०५/२०२१
२/५/२१

प्रति,

प्राचार्य,
इकरा शिक्षण संस्था संचलित इकरा उर्दू अध्यापक विद्यालय,जळगांव ता.जि.जळगांव

**विषय :- सन २०२०-२१ साठी कायम विना अनुदानित अध्यापक विद्यालयातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नेमणुकीस मान्यते बाबत..**

संदर्भ :- १) मा.संचालक, महाराष्ट्र राज्य शै. सं. व प्र.प. पुणे यांचे कडील पत्र शिशिप्रशा-१ (१) स्टॉप्रो/प्रतिस्वाक्षरी/१८१०/२०१४ दिांक १४/०६/२०१४

२) प्राचार्य जि.शि.व प्र.स.जळगांव यांचे कडील पत्र क्रं. ७१/२०२०-२१ दि.२२/०२/२०२१

उपरोक्त विषयान्वये आपण सादर केलेल्या माहितीनुसार इकरा शिक्षण संस्था संचलित इकरा उर्दू अध्यापक विद्यालय,जळगांव ता.जि.जळगांव ( उर्दू - माध्यम ) या अध्यापक विद्यालयाच्या आवश्यकते प्रमाणे सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षासाठी नियुक्त केलेल्या शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शैक्षणिक वर्ष सन २०२०-२०२१ या वर्षासाठी खालील नमुद करण्यात आलेल्या अटींच्या अधीन राहुन व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम ९ च्या अधिन राहुन मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने टीसीएम/१०९३/(१/२३)१ माशि-४, दिनांक ३१ मे १९९३ अन्वये अध्यापक विद्यालयातील वर्गाची संख्या व तरतुद केलेला पर्यायी अभ्यासक्रम व त्यावर शिकविले जाणारे वैकल्पिक विषयासहित अभ्यासक्रम व त्यानुसार उपलब्ध कार्यभार आवश्यक आहे.

१. शासन पत्र क्रं. टीसीएम/१०००/(२३२/२०००) माशि-४, दिनांक ११ जुलै २००१, व मा. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे-३० यांचेकडील पत्र क्रं. मराशैसंप्रप/राशिप्रम/अविप्रवा/ २००१-०२ दिनांक ०८.०८.२००१ दिनांक ०८.११.२००१, दिनांक ०३.०४.२००३, दिनांक २५.०५.२००९ व दिनांक २४.०६.२००९ अन्वये सुचना दिल्या प्रमाणे एनसीटीई दिनांक ३१.०८.२००९ च्या निकषा प्रमाणे देयत होत असणाऱ्या संच मान्यतेनुसार शैक्षणिक व व्यावसायीक पात्रतेच्या अधिन राहुन व त्याप्रमाणे आपण पात्रतेची खात्री केलेली आहे.

२. आपण सादर केलेल्या प्रस्तावात दाखविलेल्या कार्यभार शासन नियमानुसार नसल्यास संबंधितांची संपुर्ण वेतनाची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्य यांची राहील.

३. संस्थेने केलेल्या नेमणुकांची (शालेय समितीने) केलेली कार्यवाही गरजेनुसार व आवश्यक्तेनुसार आहे. याची खात्री प्राचार्य यांनी संबंधीतंना अध्यापक विद्यालयात हजर करुन घेण्यापुर्वी केलेली आहे.

४. प्रस्तावाच्या वेळी दाखविलेला कार्यभार नियमानुसार आहे याची खात्री आपण स्वतः करुन घेतलेली आहे. कमी कार्यभार असल्यास होणाऱ्या परिणामाची वैयक्तिक जबाबदारी प्राचार्य यांची राहील.

५. अध्यापक विद्यालयात मंजुर पदापेक्षा जास्त शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मान्यता दिली गेली नाही मान्यता दिलेल्या शिक्षकांचे वेतन संस्थेने अदा करावे.

६. पुढील वर्षी NCTE-२०१४ च्या नियमानुसार संच मान्यता मंजूर करुन घ्यावी. व त्या प्रमाणे शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी.

वरील अटी व शर्तीच्या पुर्तता पुर्ण करण्याच्या अटीवर खालील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मान्यता देण्यात येत आहे.